| MHKO190000272024 | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राधानगरी यांचे न्यायालयात** |
|---|---|
| - | **निशाणी क्रमांक १० खालील आदेश**<br>**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.०१/२०२४**<br>**(दिनांक ०४/०६/२०२५)** |

प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी, निवासी आदेश, संरक्षण आदेश व वैद्यकीय खर्च मागणी मिळणेकरीता सादर केला आहे.

**अर्जदाराची थोडक्यात कथनेः–**

२. अर्जदार व वि.प.क्र.१ यांनी कोल्हापूर येथील राजर्षी शाहू एन्क्लेव्ह येथे जावून ०४/११/२०२२ रोजी अर्जदार हिच्या कुटुंबियांच्या इच्छेविरूद्ध विवाह केलेला आहे. तेव्हापासून अर्जदार ही वि.प.क्र.१ याचे कौलव येथे असलेल्या घरी राहण्यास गेली. अर्जदार हिने सर्व संसारीक कामे उत्तमरित्या पार पाडलेली आहेत. त्यासोबतच ती स्पर्धा परीक्षेचा अभ्यास देखील करत होती. शिक्षणासाठी अर्जदार व वि.प.क्र.१ हे कोल्हापूरला रहायला गेले. अर्जदार हिने बँकिंगचा क्लास लावला व वि.प.क्र.१ ने एम.पी.एस.सी. परीक्षेचा क्लास लावला. दोन महिन्यानंतर वि.प.क्र.१ ला सर्दी खोकल्याचा त्रास झाला व त्याची मानसिक स्थिती बिघडली. त्याचे छातीचा एक्स–रे व इतर अनुषंगिक वैद्यकीय अहवाल हे नकारात्मक आले असून देखील वि.प.क्र.१ वारंवार विनाकारण औषध घेत होता व त्याला कोणताही आजार नसताना अर्जदारास मानसिक व शारिरीक त्रास देत होता.

३. अर्जदार पुढे कथन करते की, वि.प.क्र.१ कोणते ना कोणते कारण करून अर्जदारास क्लासमधून बाहेर घेवून जात होता. वि.प.क्र.१ अर्जदारास वारंवार "माझं आयुष्य संपत आलेलं आहे, मी मयत झालेनंतर तुला दुसरं लग्न करावे लागणार आहे" असे म्हणून मानसिक व शारिरीक त्रास देत होता.

४. अर्जदार पुढे असे कथन करते की, वि.प. ने मोटरसायकल घेणेसाठी अर्जदारकडे वारंवार रक्कम रु.१,००,०००/– ची मागणी केली. त्या कारणाने वि.प.क्र.२ व ३ यांनी देखील अर्जदार हिचा मानसिक व शारिरीक छळ करून, अर्वाच्य शिवीगाळ करून, ठार मारण्याची धमकी देवून अर्जदार हिस वि.प. यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून अंगावरील कपड्यानिशी, दागदागिने काढून घेवून घरातून हाकलून दिले आहे. अर्जदार या पुढे कथन करते की, तिची भारतीय डाक विभागामध्ये निवड झालेली असतानाही वि.प.ने सदर नोकरीस जाणेकरीता मज्ञाव करून आलेले ऑनलाईन कॉल लेटर देखील तिला दिले नाही. अशा प्रकारे वि.प. यांनी अर्जदार हिचा मानसिक व शारिरीक छळ केलेला आहे.

५. अर्जदार पुढे असे कथन करते की, दि.१७/१२/२०२३ रोजी अर्जदार व वि.प. यांचे मध्यस्थ नातेवाईकांमध्ये बैठक झाली. सदर बैठकीत वि.प. यांनी अर्जदार हिला मानसिक व शारिरीक त्रास दिल्याबद्दल तसेच तिला नोकरी करण्यास केलेल्या मज्ञावाबद्दल माफी मागितली. परंतु तदनंतर देखील वि.प. यांनी अर्जदार हिस नांदावयास घेवून जाणेस कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. वि.प. क्र.१ ने तिचा विनाकारण त्याग केलेला आहे. तिची पोटपाण्याची, औषधांची काहीही व्यवस्था केलेली नाही. तिला सामाजिक, वैवाहिक व मानसिक सुखापासून वंचित ठेवलेले आहे व तिचा मानसिक आणि शारिरीक छळ केलेला आहे.

६. अर्जदार पुढे असे कथन करते की, वि.प.क्र.१ हा खाजगी नोकरीस असून त्यास प्रति महिना रु.२५,०००/– इतका पगार आहे. तसेच वि.प.क्र.२ यांचा शेती व दुग्ध व्यवसाय असून त्यांना वार्षिक रक्कम रु.३,००,०००/– चे उत्पन्न चालू आहे. त्यामुळे वि.प. हे अत्यंत संपन्न परिस्थितीत जीवन जगत आहेत. अर्जदार ही मानसिक दबावाखाली असलेने ती स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ झालेली आहे. अर्जदार विनंती करते की, ती राहत असलेल्या ठिकाणी व तिचे नोकरीचे ठिकाणी वि.प. यांना जाणेपासून व अर्जदारसोबत संपर्क साधण्यापासून प्रतिबंध करणेबाबत आदेश व्हावा. अर्जदार राहत असलेले घरभाडे देण्याची व्यवस्था वि.प. यांनी करणेबाबत आदेश व्हावा. अर्जदार पुढे विनंती करते की, अर्जदार हिला झालेल्या मानसिक धक्क्यामुळे तिला वि.प. यांनी वैद्यकीय खर्च रु. २५,०००/– व मानसिक इजा मागणे रक्कम

रु.२५,०००/– अशी एकूण ५०,०००/– रक्कम देणेबाबत आदेश व्हावा. तसेच तिला वि.प.क्र.१ कडून अंतरिम पोटगी व स्वतंत्र निवाऱ्याची व्यवस्था करणेकरीता अंतरिम भाडे दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रु.१५,०००/– देणेबाबत आदेश व्हावा, अशी विनंती केली आहे.

७. वि.प. याने नि.क्र.१४ कडे त्याचे म्हणणे दाखल केले व त्याने अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. वि.प. याचे असे कथन की, सदरचा अर्ज चुकीचा, खोटा, लबाडीचा, साधनीभूत व वस्तुस्थितीचा विपर्यास करणाऱ्या मजकूराचा आहे. अर्जदार हिच्या आईवडीलांचा सदर विवाहासाठी नकार होता. तिच्या वडीलांनी व भावाने वि.प.क्र.१ याला "माझी व माझ्या मुलाची खुप गुंडांशी ओळखी असून तुझे बरे वाईट करण्यास आम्ही मागे पुढे पाहणार नाही, तुझे आयुष्य संपवून टाकेन, परत माझे मुलीशी बोलायचे नाही, तिला फोन करायचा नाही" अशी धमकी दिली. तसेच "तुझ्या व तुझ्या घरातील लोकांवर पोलीस स्टेशनमध्ये व कोर्टामध्ये खोट्या केसेस करून तुमची गावात अब्रू घालवतो." अशी देखील धमकी दिली. तदनंतर अर्जदार हिच्या आईवडीलांनी तिचे शिक्षण थांबवून तिला घरामध्ये कोंडून ठेवणेचा प्रयत्न केला. अशा परिस्थितीतही अर्जदार हिने वि.प.क्र.१ याला ती शिक्षण घेत असलेल्या कॉलेजमध्ये बोलावून त्याला तिचे आईवडील तिच्या जीवाचे काहीतरी बरेवाईट करतील किंवा तिच्या मनाविरूद्ध दुसरीकडे लग्न लावून देतील. असे सांगून त्याने तिच्याशी लग्न नाही केले तर ती जीवाचे काहीतरी बरेवाईट करून घेईल असे सांगितले.

८. वि.प.क्र.१ पुढे असे कथन करतात की, दि.०४/११/२०२२ रोजी अर्जदार हिने वि.प.क्र.१ ला कोल्हापूर येथे बोलावून आजच्या आज लग्न नाही केले तर ती जीवाचे बरेवाईट करून घेईन, असे सांगितलेने त्या दोघांनी राजर्षी शाहू एन्क्लेव्ह येथे हिंदूधर्मशास्त्र व रीतिरिवाजाप्रमाणे विवाह संपन्न केला. तसेच अर्जदारचे आईवडील व नातेवाईक हे वि.प. तसेच अर्जदार यांचे जीवाचे काही बरेवाईट करतील याची कल्पना असल्याने अर्जदार यांनी नोटरी वकीलांकडून ॲफिडॅवीट करून घेतले. तसेच दोघांनी सदरील विवाह झाल्याबाबतची कल्पना राधानगरी पोलीस स्टेशन येथे दिली. त्यावेळी पोलिसांनी अर्जदार व वि.प. यांचे घरातील लोकांना बोलावून सदरील लग्नाबाबत कळविले. त्यावेळेस अर्जदार हिचे घरच्यांनी तेथेच

आरडाओरडा सुरू केला. दोन दिवसांत तिच्या आईवडीलांनी तिच्याकडून हक्कसोडपत्र लिहून घेतले. वि.प.क्र.१ च्या घरच्यांनी सदरील विवाहाचा स्वीकार केला.

९. वि.प.क्र.१ पुढे असे कथन करतो की, अर्जदार ही घरातून येताना कोणतीही वस्तू, दागदागिने किंवा कपडेलत्ता घेवून आलेली नव्हती. वि.प.क्र.१ ने अर्जदार हिला सोन्याचे दागिने तसेच नवीन कपडेलत्ता घेवून दिला. त्यावेळी वि.प.क्र.२ व ३ यांनी अर्जदार हिची योग्य ती सर्व काळजी घेतली. वि.प.क्र.१ ने अर्जदार हिचा डिग्री शिक्षणासाठी येणारा संपूर्ण खर्च केलेला आहे व पुढील बँकिंगचा क्लास करणेसाठी वि.प.क्र.१ ते ३ यांनी विचार करून वि.प.क्र.१ व अर्जदार यांना कोल्हापूर येथे वास्तव्यास पाठविले. अर्जदार यांचे शिक्षण पूर्ण होणेसाठी वि.प.क्र.१ हा कलेक्टर ऑफिस येथे खाजगी तत्वावर रू.१०,०००/– पगारावर नोकरी करू लागला. अर्जदार हिच्या क्लासची फी रू.१८,०००/– इतकी होती. त्यासाठी वि.प.क्र.२ यांनी पतसंस्थेमधून कर्ज काढून क्लासची फी भागवली. वि.प.क्र.१ याने अर्जदार हिच्यावर असलेल्या प्रेमापोटी व पती या कर्तव्याने सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या.

१०. वि.प.क्र.१ पुढे असे कथन करतो की, हळूहळू अर्जदार हिचा तिच्या आईवडीलांशी संपर्क सुरू झाला व ते कोल्हापूर येथील अर्जदार व वि.प.क्र.१ यांच्या घरामध्ये येणे–जाणे करू लागले. त्यांनी अर्जदार हिचे वि.प. बाबत मन दुषित करण्याचा प्रयत्न सुरू केला. यातच पुढे वि.प.क्र.१ आजारी पडले असताना अर्जदार हिचे आईवडीलांनी व नातेवाईकांनी अर्जदार हिला वि.प.क्र.१ बद्दल वाईट सांगून तिचे मन दुषित करण्यास सुरुवात केली. अर्जदार ही वयाने लहान असल्याने व सदर गोष्टींचा मनावर परीणाम झाल्याने ती वि.प.क्र.१ सोबत बारीक सारीक कारणाने भांडणे काढू लागली. वि.प.क्र.१ यांनी अर्जदार हिची समजूत काढून देखील अर्जदार ही वि.प.क्र.१ सोबत विनाकारण भांडणतंटा करू लागली. तिचे आईवडीलांनी तिच्या मनात वि.प.क्र.१ बद्दल "त्याला कोणतातरी मोठा आजार झाला असल्याने तो वारंवार आजारी पडतो, वि.प.क्र.१ याचे भविष्य काही खरे दिसत नाही, तुझे पुढील शिक्षण सर्व अपुर्ण राहिल, तसेच तुला मुल बाळ झाले तर तुझे दुसरे लग्न करायला अडचण येईल." असे सांगितले. त्याप्रमाणे अर्जदार ही गरोदर राहू नये म्हणून गर्भनिरोधक गोळ्यांचे सेवन करू लागली.

११. वि.प.क्र.१ पुढे असे कथन करतो की, या दरम्यान अर्जदार हिची भारतीय डाक विभागामध्ये निवड झाल्याबद्दल वि.प. व त्यांचे घरातील लोकांना खुप आनंद झाला. वि.प.क्र.१ ने अर्जदार हिचे सोशल मिडीयामध्ये मेसेज पाठवून अभिनंदन देखील केले. सदरील नोकरीसंबंधित गरजेचे वैद्यकीय प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रे मिळवण्यासाठी वि.प.क्र.१ यांनी सर्व ते प्रयत्न करून सर्व कागदपत्रे मिळवून अर्जदार हिला रत्नागिरी येथे नोकरीवर हजर होणेसाठी घेवून गेले. तेथे डाक विभागातील कार्यालयामध्ये लोकांची भेट घेवून अर्जदार ही नोकरीवर हजर होणार आहे व आम्हास राहणेसाठी योग्य ती मदत करा, असे देखील सांगून आले. परंतु अर्जदार हिच्या आईवडीलांनी तिला सदरील नोकरीवर हजर होवू दिले नाही. तसेच स्पर्धा परीक्षेचे फॉर्म भरण्यासाठी आवश्यक असणारी अर्जदार हिची काही कागदपत्रे ही तिच्या आई वडीलांकडेच होती, ती त्यांनी मुद्दामहून दिली नाहीत.

१२. वि.प.क्र.१ पुढे असे कथन करतो की, अर्जदार हिच्या आईवडीलांनी अर्जदार व वि.प. यांना विभक्त करण्याचा डाव आखला. त्यांनी खोटे कारण सांगून अर्जदार व वि.प. यांना त्यांचे मुळ गाव कौलव येथे बोलावून घेतले. तेथे वि.प.क्र.१ ते ३ यांचेवर खोटेनाटे आरोप करून वादाला सुरुवात केली व अर्जदार हिला वि.प.क्र.१ याच्याशी भांडणे काढायला सांगितली. अर्जदार हिने तिचे आईवडीलांचे सांगणेवरून वि.प.क्र.१ याला "तु इथून निघून जा, मला तुझ्याशी संसार करायचा नाही" असे सांगून घरातून हाकलून दिले. त्यानंतर वि.प.क्र.१ हे कौलव येथील त्यांचे असलेल्या घरी गेले व सदरचा घडला प्रसंग त्यांचे आईवडीलांना व नातेवाईकांना सांगितला. गावातील प्रतिष्ठीत नागरीक तसेच वि.प.क्र.१ ते ३ यांचे नातेवाईक यांनी सदर घटनेबाबत अर्जदार व तिचे आईवडीलांना विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देवून सर्वांना घरातून हाकलून दिले. अर्जदार व त्यांचे घरचे लोकांशी वेगवेगळ्या मार्गाने संपर्क साधणेचा प्रयत्न केला असता, त्यांनी कोणतीही दाद दिली नाही. वि.प.क्र.१ ला कोणत्याही कारणाशिवाय सामाजिक, वैवाहिक व मानसिक सुखापासून वंचित ठेवलेले आहे.

१३. वि.प.क्र.१ पुढे असे कथन करतो की, वि.प.क्र.१ व अर्जदार यांचा हा संसार केवळ दीड ते दोन वर्षे टिकला. त्यातील सर्वाधिक काळ वि.प.क्र.१ व अर्जदार हे एकटे कोल्हापूरला राहत होते. वि.प. यांनी अर्जदार हिला कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा छळ केलेला

नाही. याउलट, अर्जदार व वि.प.क्र.१ चा संसार सुखाचा होणेसाठी सर्वतोपरी प्रयत्न केलेला असून अर्जदार हिला शिक्षणासाठी देखील लागणारी मदत केलेली आहे. वि.प. यांनी कोल्हापूर न्यायालयात अर्जदार हिने नांदणेस परत येणेकरीता दावा दाखल केलेला आहे. वि.प.क्र.१ हे अर्जदार यांचेसोबत संसार करणेस तयार आहेत. अर्जदार हिने विनाकारण वि.प.क्र.१ याचा त्याग केलेला आहे.

१४. वि.प.क्र.१ पुढे असे कथन करतो की, अर्जदार ही खाजगी नोकरी करत असून दरमहा रक्कम रू.२०,०००/– कमावते. तसेच तिचे वडील शिक्षक असून त्यांना भरघोस पगार आहे. त्यांचे वडीलोपार्जित शेत असून त्यांना चांगले उत्पन्न मिळते. तसेच वि.प. यांनी कोणत्याही स्वरूपाचा कौटुंबिक हिंसाचार केले नसलेमुळे अर्जदार हिचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा, अशी विनंती केली.

१५. अर्ज व म्हणणे मधील कथनांचे तसेच दोन्ही बाजुच्या वकीलांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले असता माझ्यासमोर खालील विचाराधीन प्रश्न उत्पन्न झालेले आहेत. त्यावरील कारणमिमांसा निष्कर्षासह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही प्रथमदर्शनी हे सिध्द करते काय की, वि.प. याने तिचे विरुध्द कौटुंबिक हिंसाचार केला आहे? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्याकरीता पात्र आहे काय? आहे तर, किती ? | अंशतः होकारार्थी. ( अर्जदार हिला दरमहा रु.२०००/– प्रमाणे) |
| ३. | अर्जदार ही निवासी आदेश अथवा अंतरीम घरभाडे मिळण्यास पात्र आहे का ? | अंशतः होकारार्थी. (अर्जदार हिला दरमहा रु.१५००/– प्रमाणे) |
| ४. | अर्जदार ही वि.प. यांचेकडून वैद्यकीय खर्च मागणी रक्कम रु.२५,०००/– व इतर कोणतीही हिंसा | स्थगित. (अंतिम अर्जाचेवेळी |

| | | |
|---|---|---|
| | मानसिक इजा मागणी रक्कम रु.२५,०००/- अशी एकूण रक्कम रु.५०,०००/- मिळणेस पात्र आहे का? | विचारात घेण्यात येईल.) |
| ५. | अर्जदार राहत असले ठिकाणी व नोकरीचे ठिकाणी वि.प. यांना जाणेपासून प्रतिबंध अशा स्वरूपाचे संरक्षण आदेश मिळणेस पात्र आहेत का? | होकारार्थी. |
| ६. | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला. |

१६. अर्जदारतर्फे व वि.प.क्र.१ तर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

१७. अर्जदार हिने नि.क्र.९ कडे तर वि.प.क्र.१ ने नि.क्र.११ कडे मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. संरक्षण अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात कौटुंबिक घटना अहवाल दाखल केलेला आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.१ बाबत</u>:**

१८. अर्जदार व वि. प. हे पती पत्नी आहेत ही बाब निर्विवाद आहे. ' दि.१७/१२/२०२३ रोजी अर्जदार व वि.प. यांचे मध्यस्थ नातेवाईकांमध्ये बैठक झाली. सदर बैठकीत वि.प. यांनी अर्जदार हिला मानसिक व शारिरीक त्रास दिल्याबद्दल तसेच तिला नोकरी करण्यास केलेल्या मज्ज्ञावाबद्दल माफी मागितली. तद्नंतर वि.प. यांनी अर्जदार हिस नांदावयास घेवून जाणेस कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. वि.प. क्र.१ ने तिचा विनाकारण त्याग केलेला आहे. तिची पोटपाण्याची, औषधांची काहीही व्यवस्था केलेली नाही. तिला सामाजिक, वैवाहिक व मानसिक सुखापासून वंचित ठेवलेले आहे व तिचा मानसिक आणि शारिरीक छळ केलेला आहे,' असे अर्जदार हिने कथन केले आहे. याउलट वि.प. याने अर्जदार क्र.१ हिने स्वतःहुन वि.प. चा विनाकारण त्याग केला असुन ती माहेरी रहात आहे असे कथन केले आहे.

१९. प्रस्तुत प्रकरणात संरक्षण अधिकारी यांनी दाखल केलेला कौटुंबिक घटना

अहवाल पाहिला असता त्यामध्ये प्रस्तुत अर्जात नमुद मजकुराशी बऱ्याचअंशी सुसंगत असा मजकुर नमुद असल्याचे दिसुन येते.

२०. अर्जदार ही वि.प. पासुन विभक्त रहात असल्याचे दोन्ही बाजुंचे कथनांवरुन स्पष्ट होते. अर्जदार ही वि.प याची पत्नी आहे. अर्जदार हिचे मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्र (नि.क्र.९) पाहिले असता, ती दिनांक १७.१२.२०२३ पासून तिचे माहेरी रहात असल्याचे दिसुन येते. प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे वि.प. याने अर्जदार यांचे पालनपोषणाची जबाबदारी पार पाडलेली नाही. अर्जदार हिचे पालनपोषण करण्याची वि.प. याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. परंतु अर्जदार ही माहेरी रहात असल्यापासून तिची पालनपोषणाची वि.प. याने जबाबदारी पार पाडली असे दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा वि.प. याने प्रकरणात दाखल केलेला नाही. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कलम ३ नुसार पोटगीपासुन वंचित ठेवणे ही बाब कौटुंबिक हिंसाचार आहे. वि.प. याने अर्जदार हिची पालनपोषणाची जबाबदारी पार पाडली नसल्याने वि.प. याने अर्जदारविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते. सबब, मी विचाराधीन प्रश्न क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.२ बाबतः–</u>**

२१. अर्जदार हिचे कथनांप्रमाणे तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही व वि.प.क्र.१ ला प्रति महिना रू. २५,०००/– व शेती व दुग्ध व्यवसायातून वार्षिक रू. ३,००,०००/– उत्पन्न मिळते. वि.प याला वर नमूद असलेप्रमाणे उत्पन्न मिळते असा दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. परंतु वि.प.क्र.१ याचे म्हणणेतील कथनांवरुन तो सक्षम व कमावता इसम असल्याचे दिसुन येते. वि.प.क्र.१ ने मालमत्ता व उत्तरदायित्व शपथपत्रामध्ये (नि.क्र.११) कथन केल्याप्रमाणे तो पदवीधारक असल्यामुळे कोठेही चांगल्या उत्पन्नाची नोकरी करण्यास पात्र असल्याचे दिसून येते. त्याची शैक्षणिक पात्रता लक्षात घेता तो दरमहिना रू. २०,०००/– ते २५,०००/– इतके उत्पन्न मिळु शकते असा अंदाज बांधता येवु शकतो. तसेच वि.प.क्र.१ ने अर्जदार ही प्रतिमहिना रु.२०,०००/– कमवत असलेबाबतचे कथन केले आहे. सदरील कथनाबाबत वि.प.ने जरी कोणता कागदोपत्री पुरावा दाखल केला

नसला आणि अर्जदारने सदरील कथन जरी नाकरले असले तरी देखील तिने 'वि.प. ने तिच्या नोकरीच्या ठिकाणी येण्यापासून प्रतिबंध करणेबाबतच्या आदेशाची विनंती केली आहे' हे विचारात घेता अर्जदार नोकरी करत असलेबाबतचा प्रथमदर्शनी अंदाज बांधता येवू शकतो. त्यामुळे हे सर्व विचारात घेता वि.प.क्र.१ ने अर्जदार हिला दरमहा रु.२०००/– इतकी पोटगी देणे योग्य व न्यायोचित राहील. सबब, मी विचाराधीन प्रश्न क्र.२ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.३ बाबत:–**

२२. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार हिने वि.प.क्र.१ ने तिची राहण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करणेकरीता अंतरीम पोटगीसोबत घरभाडेपोटी रक्कम रु.१५,०००/– असा आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे. आजरोजी अर्जदार हिने ती राहत असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच तिला स्वतंत्र राहण्याची व्यवस्था कोठे व कशा प्रकारची असावी याबाबत देखील कथन केल्याचे दिसून येत नाही. अर्जदार हिला राहण्याची व्यवस्था आहे, याबाबत वि.प. तर्फे देखील कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अशा परीस्थितीमध्ये अर्जदार हिला अंतरीम घरभाडेपोटी प्रतिमहा र.रु.१५००/– वि.प.क्र.१ कडून देणे न्यायोचित होईल. अशा प्रकारे मी प्रश्न क्र.३ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.४ बाबतः–**

२३. अर्जदार हिने वि.प. यांचेकडून वैद्यकीय खर्च मागणी रक्कम रु.२५,०००/– व इतर कोणतीही हिंसा मानसिक इजा मागणी रक्कम रु.२५,०००/– अशी एकूण रक्कम रु.५०,०००/– मिळण्याची विनंती केली आहे. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता वि.प. यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तुर्तास्त कौटुंबिक हिंसाचार झाल्याबाबत गुणदोषावर सिद्ध झालेले नाही. हे विचारात घेता अंतरीम अर्ज निकाली काढतेवेळी वैद्यकीय खर्च मागणी व इतर कोणतीही हिंसा मानसिक इजा मागणी देणे न्यायोचित ठरणार नाही. सदरील विनंती ही अंतिम अर्ज निकाली काढतेवेळी विचारात घेणे योग्य राहील. अशा प्रकारे तुर्तास्त प्रश्न क्र.४ चे उत्तर स्थगित ठेवणेत येत आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.५ बाबतः–**

२४. अर्जदार हिने ती राहत असलेल्या घरी तसेच नोकरी करत असलेल्या ठिकाणी वि.प. ने येण्यास प्रतिबंध असा आदेश तसेच तिच्याशी संपर्क करण्यास प्रतिबंध करणेबाबतचा आदेश पारीत करणेसाठी विनंती केली आहे. अर्जदार हिच्या अर्जामधील कथनांचे अवलोकन करता त्यामध्ये वि.प.क्र.१ वारंवार अर्जदार हिच्या क्लासला जाऊन तिला शिक्षण न घेवू देता बाहेर घेवून जात असलेबाबतचे कथन केलेले आहे. अर्जातील संपुर्ण कथने विचारात घेता अर्जदार हिला संरक्षण आदेश देणे न्यायोचित राहिल. परंतु अर्जदार व वि.प. हे एकाच गावातील रहिवाशी असल्याचे दिसून येते. हे विचारात घेता वि.प. यांना अर्जदार राहत असलेल्या घराच्या सभोवतालच्या परीसरात जाण्यास प्रतिबंध घालणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे वि.प.यांनी अर्जदार राहत असलेल्या घरी तसेच तिच्या नोकरीच्या ठिकाणी जाण्यास तसेच तिच्याशी संपर्क साधण्यास अंतिम निकालापावेतो प्रतिबंध घालण्यात येत आहे. अशाप्रकारे प्रश्न क्र.५ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.६ बाबतः–**

२५. वर नमुद चर्चा व विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ५ चे निष्कर्ष लक्षात घेता, अर्ज अंशतः मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे:

**– आदेश –**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.

२. वि.प. याने अर्ज दाखल तारखेपासुन ते अंतिम निकालापावेतो अथवा अन्य कोणता पुढील आदेश पारीत होईपर्यंत अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.२०००/– (रुपये दोन हजार फक्त) इतकी अंतरिम पोटगी द्यावी.

३. वि.प. याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.१५००/–(रुपये एक हजार पाचशे फक्त)

एवढी रक्कम घरभाडे करीता अर्ज दाखल तारखेपासून ते अंतिम निकालापर्यंत अथवा अन्य कोणता पुढील आदेश पारीत होईपर्यंत द्यावी.

४. वि.प. यांना निर्देशित करण्यात येते की, अर्जदार राहत असले घरी तसेच अर्जदारच्या नोकरीचे ठिकाणी वि.प. यांना अंतिम निकालापावेतो अथवा अन्य कोणता पुढील आदेश पारीत होईपर्यंत जाणेपासून प्रतिबंध करण्यात येत आहे.

५. सदर अर्जाचे खर्चाचा विचार अंतिम आदेशाचे वेळी करण्यात येईल.

६. सदर आदेशाची प्रत अर्जदार व वि.प. यांना विनामुल्य देणेत यावी.

sd/-

दिनांक :०४/०६/२०२५ **( एन. पी. काकडे )**

ठिकाण : राधानगरी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी.